कविकुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथील ॲकडेमिक रिसर्च सेंटर इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी निधी वितरीत करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांक :- संकीर्ण -२०२४/ई-१७३७२७२/विशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०२६.

**ज्ञापन :-**

कविकुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथील ॲकडेमिक रिसर्च सेंटर इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकाम करण्याकरिता रु.४,६५,५८,३२७/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.८९.३० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. कुलसचिव, कविकुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांचे दि.२१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार रु.१,२०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी वीस लक्ष फक्त) इतकी तरतूद खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

(१) विद्यापीठास ज्या उद्दिष्टासाठी अनुदान मंजुर केले आहे, त्याच उद्दिष्टासाठी वापर करावा आणि त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांचेमार्फत तात्काळ शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.
(२) बांधकामाची प्रगती शासनास वेळोवेळी अवगत करावी.
(३) विषयांकित कामाकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही, याद्दष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.
(४) वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशेब महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई किंवा प्रकरण परत्वे महालेखापाल-२ नागपूर किंवा त्यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता विद्यापीठाने सादर केली पाहिजेत.

२. सदरहू मंजूर झालेला निधी कोषागारातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सहायक संचालक (लेखा), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३.	सदर कामाचा खर्च "मागणी क्रमांक - डब्ल्यु-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण ०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०४, विद्यापीठांना सहाय्य, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना १०२, विद्यापीठांना सहाय्य, (००) (१४) कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर यांचा विकास (२२०२ ३४९५), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर)" लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ मधील मंजूर तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

४.	सदर शासन ज्ञापन, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२६, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.०९.०४.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. या शासन परिपत्रकातील परिशिष्ट मधील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे.

५.	सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र.५०३/व्यय-५ दि.१८/०९/२०२६) निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१३१५०३२७७८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP
PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.10.13 15:04:15 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
५. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल, (लेखा परीक्षण) -१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. कुलसचिव, कवीकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.
९. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
११.अवर सचिव (अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.